ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मराठवाड्यातील कला स्थापत्य

डॉ. लदाफ शफी खाजामैनोद्दीन
इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय, औसा ता. औसा जि. लातूर .

## प्रास्तावीक :-



शिल्प स्थापत्य कला ही प्राचीन भारतीय कले पैकी सर्वात सुंदर व प्रभावीत होणारी कला होय प्राचीन भारतीय वाःयमात 64 कला उल्लेख आलेला आहे. या कलेत कलाकारांच्या प्रतिमेचा अप्रतिम नुमना आपल्याला दिसुन येतो या स्थापत्य कले मध्ये दगडासारखे चिरस्याची माध्यम या कलाविकासाठी वापरण्यात आल्यामुळे या कला वैभवांचा वारसा हजारो वर्षापासुन टिकुन राहीला आहे. आणि कला अशिषाच्य स्थानी तो आज जिवंत आहे. इ.स. पुर्व तिसऱ्या शतकात सुरु झालेली कला, ही परंपरा चौदाव्या शतकापर्यंत अव्हानात्मक पणे उभी राहिली आहे. या दीड हजार वर्षाच्या कलेल्या साधनतेतुन असंख्य अनेक कलाकांराची कला व त्याचे स्वप्ने साकार झाले आहेत. याच कलाकारांच्या स्वप्नांचे शब्द शिल्प भगण अवश्येषाच्या रुपात विखुरलेली आढळतात. मोर्य, शुंग, सातवाहन, गुप्त, वाकाटक, चालुक्य, आणि यादव या कला प्रेरणांचे आश्रस्थान दिल्यामुळे या कलाकारांचे स्वप्न साकार झाले. सुलतान शाहीच्या काळात व मुघल आणि मराठा कालखंडात मध्ययुगीन संस्कृतीची छाप दाखवणारे कांही शिल्प स्थापत्य मराठवाड्यात निर्माण झाले. या शिल्प स्थापत्याच्या माध्यमातुनच प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील मराठवाड्याचे विविध क्षेत्रात केलेली वैभवशाली वाटचाल पाहवयास मिळते. शिल्प स्थापत्यातुन प्राचीन व मध्ययुगीन काळाचे राजकीय सामाजीक आर्थिक, धार्मीक आणि सांस्कृतीक जीवनाचे विविध पैलु पहावण्यास मिळतात. प्राचीन काळापासुन मानवाने आपले जीवन कोणकोणत्या पध्दतीने जीवन विकसित केले याचे जवलंत उदाहरणाचे चित्र कला स्थापत्य दिसुन येते, मराठवाड्यातील शिल्प स्थापत्यांची परंपरा इ.स.नाच्या पूर्व पहिल्या शतकापासुन प्रारंभ होते. मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील प्रतिष्ठानच्या(पैठन) सातवाहन सत्तेचा उदय झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने शिल्प स्थापत्य व कला अविष्काराचा उदय झाला. अजिंठ्याचया डोगरातील पितळखोऱ्याच्या परिसरातील वेरुळ, शिरुर, लेणी, माहूर येथील लेणी, खरोसा लेनी, धाराशिव लेणी, इत्यादी लेनीतील भिंतीवर निरनिराळ्या प्रकारचे लेख देऊ येथील चित्रकारांनी आपल्या चित्रकलेची श्रेष्ठता घडवीली.[1]

## वास्तुकला :

वास्तुकला या कलेच्या प्रकारात घरे, राजवाडे, लेणी, किल्ले, मंदिरे, या वास्तुंचा समावेश होतो, वास्तुकलेंचे सर्वात प्राचीन अवशेष आपल्याला मोहंजोदाडो व हडप्पा संस्कृतीत पाहवयास मिळतात. या दोन्ही ठिकाणी तेथील वस्तुंचे नमुने प्राप्त झालेले आहेत. मोर्यकाळखंडात मात्र मात्र वास्तुकलेचा चांगलाच विकास झालेला दिसुन येतो. चंद्रगुप्त मौर्याने पाटलीपुत्र येथे बांधलेला राजवाडा हा मोर्य काळखंडातील वास्तुकलेचा एक सुंदर नमुना ठरतो तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील पैठन येथे सातवाहनांचा भव्य राजवाडा होता. त्याच प्रमाणे तेर व भोकरदन येथे ही सातवाहन काळातील वस्तु कलेचे अवशेष आढळुन आलेले आहेत. तसेच राष्ट्रकुट काळातील वास्तु कलेचे नमुने सुध्दा आढळुन आलेले आहेत. मोर्य काळातच डोंगर खोदुन वास्तु बनविण्याची नवीन कला किंवा प्रकार याच काळात असत्तीत्वात आल्या. या वास्तुंना शैल्य गृह, किंवा गिरीशिल्प म्हणतात. तसेच याला वास्तुचे चैत्य आणि विहार असे दोन प्रकार पडतात, वेरुळ अजिंठा भाजे कार्ले जुन्नर,एलिफंटा व उस्मानाबाद येथे चैत्य व विहार स्वरुपातील वास्तु पाहवण्यास मिळतात तसेच गुप्त कालखंडात दगड विटानी बांधलेले मंदिर ही वास्तु प्रकार उद्यास आले. कंधार येथे राष्ट्रकुट काळातील बारा शिवमंदिरे होती अशिच मंदिरे

कांची, महाबलिपुरम, होटल(देगलुर) ,धर्मापुरी (परळी) निळकंठेश्वर निलंगा (लातूर) , बीड, भोकर, आन्वा, ओढा नागनाथ व चारठना येथे आढळतात. स्तुप हा वास्तुचा एक प्रकार आहे सारणानाथ सांची येथील खुप प्रसिध्द आहे.[2]

## 3) शिल्प कला :

शिल्प कला हि एक कलेचा प्रकार आहे. शिल्प कलेत विभिन्न प्रकारच्या मुर्तीशिल्पांचा समावेश होतो तसेच डोंगरात कोरलेल्या वास्तु शिल्पांचा ही यामध्ये समावेश करता येईल. भारतीय संस्कृती शिल्प केलेची सुरुवात वास्तु कले प्रमाणे हाडप्पा आणि मोहंजोदाडो संस्कृतीपासुन झाली. येथील उत्खनात भाजलेल्या मातीचे शिल्पे, दगडी शिल्पे, व मुद्रा मिळाल्या आहेत. येथे मिळालेल्या दगडी शिल्पांची संख्या 11 आहे त्यापैकी तीन दगडी शिल्पे प्राण्यांची आहेत. मोर्य काळात शिल्प कलेचा विकास झाला. अशोकाने अनेक ठिकाणी स्तंभ उभारले या स्तंभावर घोडा, सिंह, बैल, इत्यादी प्राण्यांची मुर्ती कोरण्यात आल्या या शिल्प कलेचे उत्कृष्ठ नमुने शूंग,कन्व, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट काळात शिल्प कला उच्च शिखरावर पहोचली होती हि शिल्प कला मराठवाड्यातील वेरुळ आजंठा कंधार इत्यादी शिल्प कलेचे सुंदर नमुने पहावयास मिळतात.

## विहार स्थापत्य :

अजिंठा, औरंगाबाद, वेरुळ येथील विहारा मध्ये वास्तुशैली दृष्ट्या खुपच सामन्य आहे वेरुळ येथील विहार विशेषतः दोन ताल आणि तीन ताल या नावाने ओळखले जाणारे क्र. 11,12 ची लेणी त्यात आढळणाऱ्या वैशिष्ट्ये पुर्ण वास्तुशास्त्रीय आणि मुर्तिशास्त्रीय विकासामुळे महत्त्वाचे आहे. या लेण्यांच्या सखोल अभ्यास करणाऱ्या प्राध्यापक स्मिक यांच्या मते अजिंठा आणि वेरूळ येथील विहार स्थापत्याचा विकास समजुन घेण्याकरिता अजिंठा येथील लेणी क्र. 06 (खालचा मजला 21 घटोत्कच लयन समुहातील विहार लेने आणि औरंगाबाद येथे लेने क्र. 7 या लेण्यांच्या तलविन्यासांचा अभ्यास अपरिहार्य आहे.)[4]

अजिंठा लेणी : अजिंठा लेणी येथे बौध्द लेणी आहेत त्यापैकी, 1,2,12,17,19 खोदकाम करण्यास गुप्तांनी मदत केली. लेणी क्र. 02 ही लेणी विहार लेणी आहे या लेणीत आणि पहिल्या क्रमांकाच्या लेनीत बरेच साम्य आहे. समोर एक दालन असुन त्याच्या दोन्ही बाजुस एक एक खोली आहे. या खोल्या समोर स्तंभावर आधारलेला मंडप आहे. मुख्य प्रवेश द्वारावर सूंदर शिल्प कामे केलेले आहेत. प्रवेश द्वाराच्या दोन्ही बाजूस खिडक्या आहेत. प्रवेश द्वारातुन आत प्रवेश केल्यास एक स्तंभयुक्त मंडप लागतो. क्ष्याच्या चारही बाजुस प्रांगण आहे. लेणीच्या पाठीमागील भिंतीत गर्भग्रह आहे. त्यामध्ये गौतमबुध्दाची एक भव्य मुर्ती आहे व्याख्यान मुद्रेत कोरली आहे. मुर्तीच्या दोननही बाजुस चवरी घेतलेल्या दोन प्रतिमा कोरल्या आहेत. डाव्या बाजुकडील प्रतिमा पद्पाणीची आहे. गर्भग्रहाचा दरवाजा व अंतराळातील स्तंभावर सुंदर कोरीव काम केलेले आहे. अंतराळयाच्या दोन्ही बाजूस एक एक उपग्रह आहे उजव्याबाजूकडील गर्भगृहात पंचीक व हरितीच्या मूर्ती आहेत. त्याच्याखाली आकर्षण व सूंदर दृश्य कोरले आहेत. उजव्या बाजूस शिक्षकाच्या हातातील छडीला भिऊन तीन मुलें ध्यानपूर्वक अभ्यास करीत आहेत. त्यांच्या पेक्षा थोडे दुर पाच मुले मेंडी या प्राण्यांशी खेळयांत मग्न आहेत. उजव्या बाजुला दोन भव्य यक्ष मुर्ती आहेत. त्यांच्या हातात शंख व पद्य असल्याचे शंख निधी व पद्य निधी दाखविण्याच्या प्रयत्न केला असावा. या लेणीत भग्न अवस्थेतील कांही चित्रीत अभिलेख आहेत. हे इ.स.नाच्या सहाव्या शतका पुर्वर्धात लिहलेले असावे.[5]

## शिऊर लेणी :

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील शिऊर नावाचे एक खेडे गांव आहे त्या गावाची लोकसंख्या 727 आहे. हे गाव मराठवाडा –विदर्भाच्या सरहद्दीवर असुन पैनगंगा नदीच्या अगदी दक्षिण काठावर वसलेले आहे. पैनगंगेच्या दक्षिण बाजुस मराठवाडा आणि उत्तर बाजूस विदर्भ आहे. हे गांव हादगाव पासुन 40 कि.मी. अंतरावर आहे. जाण्यासाठी नांदेड होऊन दोन मार्ग आहेत. एक नांदेड हुन निघाल्या नंतर मानवाडी फाट्यावरुन निवघा बाजार कोळी, तळणी,आमग व्हाण मार्ग शिऊरला जाता येते. दुसरामार्ग नांदेड होऊन अर्धापुर, वारंगाफाटा, आखाडा बाळापुर , माळेगांव फाटा, अशा ही मार्गने शिऊर ला जाता येते.[6]

या गावाच्या नैत्र्यवरु थोड्याच अंतरावर असलेल्या एका डोंगरात तीन लेण्यांचा समुह आहे. या लेण्या वैष्णव धर्मीय असुन या लेण्याची निर्मिती वाकाटक काळात झाली आहे. लेणींच्या खोदकामासाठी आवश्यक असलेला योग्य प्रकारचा खडक नसल्यामुळे लेणींचे खोदकाम आणि त्यामधील शिल्प अर्धवट अवस्थेत सोडुन द्यावे लागले. डॉ. प्रभाकर देव

व डॉ. जी.सी. शेळके यांनी लेणींची सविस्तर सर्वेक्षण पाहणी केली इ.स. 1972 साली. ज्ञात झालेल्या या लेणींना इ.सन. 1985 साली शासनाने संरक्षित स्मारक म्हणुन मान्यता दिली. स्थापत्य शास्त्रीय दृष्टीकोणातुन पाहिल्यास येथील तिनही लेणींचे रेखाटन सारखेच आहे. लेणीतील स्तंभाचे रेखाटन ओबडधोबड असुन लेणी स्थापत्याच्या विकसीत अवस्थेतील कोणतेच संकेत लेणी मध्ये आढळुन येत नाही, येथील लेणीत सभामंड आणि गर्भ ग्र,ह असुन त्यातील स्तंभावर विष्णू, ब्रम्हा, नृसिंह, वराह, राम. इत्यांदी देवतांची शिल्पे कोरलेली आढळतात. येथील लेणीतील सर्व शिल्पे झिजलेली आहेत. लेणी क्र. 01 मध्ये कोरलेले सभागृह अर्धवट आहे. दोन मध्ये पदक्षिणापथ कोरण्याचा प्रयत्न केला आहे. पण हा देखील अर्धवट आहे. लेणी क्र. 03 मध्ये पदक्षिणापथ कोरुन पूर्ण केला आहे. याच लेणीत सुबक असा गरुड कोरला आहे. येथील एका लेणीत ब्रम्हा आणि विष्णू हे शिवलिंगाची पुजा करीत असल्याचे शिल्प, महत्त्पूर्ण आहे. [7]

### वेरुळ लेणी :

औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यात वेरुळ नावाचे गांव आहे. या गावाजवळील चरणाद्री नावाच्या डोंगरात हिंदू बौध्द आणि जैन अशा 34 लेण्या खोदल्या आहेत. वेरुळ येथील लेणी समुहात दक्षिणकडील पहिलया बारालेणी बौध्दधर्मीय आहेत. यामधील दहाव्या क्रमांकाची विश्वकर्मा लेणी या नावाची लेनी चैत्य आहे. बाकीच्या अकरा लेणी विहार आहेत. या सर्व बौध्द लेणीमध्ये पहिल्या पाच लेणी प्राचीन आहेत. या पाच लेनी पैकी पाचव्या क्रमांकाची लेणी स्थापत्याच्या दृष्टीने अजिंठा लेनीशी मिळत्याजुळत्या आहेत. या सर्व लेणी एकमजली आहेत. समोर दालन मध्यभागी गर्भग्रह, अंतिम भागात देवस्थान व डाव्या बाजुस भिक्कुंना राहण्यासाठी खोल्या आहेत. येथील सर्व बौध्द लेनी 1 ते 5 लेण्यांचे खोदकाम वाकाटक काळखंडामध्ये इ.स.नाच्या पाचव्या व सहाव्या शतकात करण्यात आले.[8]

### खरोसा लेणी :-

मराठवाड्याच्या लातूर जिल्ह्यातील निलंगातालुक्यातील खरोसा या गावाच्या डोंगरात लेणी खोदण्यात आल्या आहेत. त्यामुळे या लेणींना खरोशाच्या लेण्या म्हणुन ओळखल्या जातात. येथील लेणी क्र. 12 सोडुन सर्व लेणी हिंन्दु धर्मीय आहेत. येथील डोंगरात खडक लालसर व वाळु मिश्रीत असुन त्याला स्थानीक भाषेत केंगल या नावाने ओळखले जाते डोंगरातील खडक ढसुळ असल्यामुळे कलाकारांना लेणी खोदकामाचे काम अर्धवट सोडुन द्यावे लागले. त्यामुळे त्याची निर्मिती इ.स. चौथ्या ते सहाव्या शतकात झाली असावी आणि या लेणींचे खोदकाम वाकाटक काळात झाले असावेत. या डोंगराच्या टेकडीची लांबी दिड कि.मी. असुन रुंदी अर्धा कि.मी. आहे. लेणी क्र. एक आणि दोन मध्ये कसल्याच प्रकारचे शिल्प काम केलेले आढळत नाही. लेणी क्र. तीन मध्ये सहा स्तंभ असुन प्रदक्षिणापथ निर्मितीचा प्रयत्न केला आहे तसेच शिव पिंड तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु खडक योग्य नसल्याने काम अर्धवट राहिले आहे. लेणी क्र. एक, दोन प्रमाणेच लेणी क्र. पाच, सहा मध्ये कसल्याही प्रकारचे शिल्प काम करण्यात आले नाही. परंतु लेणी क्र. सात आकाराने मोठी असुन त्यामध्ये नृसिंहाचे शिल्प अर्धवट अवस्थेत असल्याचे दिसुन येते. लेणी क्र. आठ प्रशस्त आहे परंतू त्यामध्ये शिल्प काम करण्यात आले नाही. लेणी क्र. नऊ ही दोन मजलि असुन पहिल्या तळमजल्यात कसलेही शिल्प काम अढळत नाही परंतू दुसऱ्या मजल्यास चौविस स्तंभ आहेत. तसेच लेणी प्रकाश रहावा यासाठी छताला एक छिद्र ठेवले आहे.या छिद्राला स्थानीक भाषेत सोमणा म्हणतात. त्याच बरोबर पावसाळ्यात या छिद्रातुन लेणीत आलेले पाणी तेथेच साठवुन राहु नये म्हणुन त्याची ही व्यवस्था केली आहे. या लेणींच्या बाजुस उपमंदिराच्या भिंतीमध्ये शिल्प काम कलेले आहे. तसेच लेणी क्र. दहाव्याच्या प्रवेश द्वारावर त्रिशुलधारी शिवाची प्रतिमा कोरलेली आहे. लेणीत प्रवेश केल्या बरोबर तांडवनृत्य करित असलेली डमरुधारी शिव प्रतिमा दिसते त्यास नटेश्वर म्हटले जाते तसेच याचलेणीत शिवपार्वती, समुद्रमंथनाचा देखावा आणि रामरावण युध्दाचा प्रसंग शिल्पांकित करण्यात आला आहे. या युध्दात रथथल मोठ्या प्रमाणत दाखवले आहेत युध्दात लक्ष्मणाला बाण लागताच हनुमान सर्व पर्वतच घेऊन येत असल्याचे या लेणीत अतिशय सुंदर दाखविण्यात आले आहे. याच लेणीत विष्णुचे नऊ आवतार शिल्पांकीत केले असुन त्यात अवतारापैकी नृसिंह,वराह,मत्स,राम हे अवतार अत्यंत सुबक आहेत. याच लेणीत नम्र झालेला गजराज अस्पष्ट अवस्थेत दिसतो. लेणी क्र. 11 मध्ये दोन मजली असुन तळमजल्यात प्रशस्त सभागृह आहे. दुसरामजला मात्र झोपडी सारखा असून त्यामुध्ये चार अस्पष्ट शिल्पे आहेत. लेणी क्र. बारा ही बौध्द धर्मीय आहे. ही सातवाहन कालीन चैत्यगृह आहे.[9]

### उस्मानाबाद येथील बौध्द लेणी :- (धाराशिव लेणी)

मराठवाड्यातील उस्मानाबाद या नगरीच्या पश्चिमेस हतलादेवीच्या डोंगराजवळ असलेल्या एका डोंगरामध्ये एकुण नऊ लेनी आहेत. त्या पैकी सहा बौध्द दोन जैन आणि एक हिंदू लेनी आहे. येथे असलेली लेणी क्र. दोन ही बौध्द लेनी

असुन या लेनींची खोदकाम इ.स.नाच्या पाचव्या किंवा साहव्या शतकात वाकाटक राजवंशाच्या काळखंडात झालेले आहे ही लेनी सर्वात प्राणी लेणी आहे ही लेणी समुहातील सर्वात प्रेक्षणीय व सुंदर आहे. लेनी क्र. एक पासुन ही लेणी विस फुट अंतरावर सर्वप्रथम खोदलेली आहे. त्यामुळे ही लेणी सर्वात प्राचीन असल्याचे स्पष्ट होते . ही लेणी शिल्प व वास्तुशिल्पांच्या दृष्टीने अजिंठा येथील वाकाटक काळात खोदण्यात आलेल्या क्रमांक 16,17 लेनी प्रमानेच आहेत.[10]

## औरंगाबाद जिल्ह्यातील अंभईचे मंदीर :

मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील अंभई येथील वंडेश्वर मंरिर हे होट्टल जि. नांदेड येथील सिद्देश्वर मंदिराप्रमाणेच असुन अंभई शिवमंदीर चालुक्य काळातील कंदिर स्थापत्य कलेचा अप्रतिम नमुना होय. मराठवाड्यातील हे मंदीर तीन गाभाऱ्यामध्ये त्रिदल पध्दतीचे असून तीन गाभारे मिळुन एकच सभामंडप होते. परंतु आता त्याचे संपूर्ण छत कोसळलेले आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. चार फुट उंची चे हे मंदी उभारण्यात आलेत आहे. या मंदिराचे गर्भगृह मंडपाच्या पश्चिम दक्षिण उत्तर बाजूस असून मंरिाची लांबी 65 फुट व रुंदी 50 फुट आहे. मंदिरातील गृभगृहाची लांबी आठ फट व रुंदी आठ फुट चौरसकृती आहे. गर्भगृहाच्या द्वारपट्टीवर गणेशाचे शिल्प कोरले आहे. दक्षिणेकडील गर्भग्रह विष्णुचे मंदिर असून उत्तरे कडील गर्भग्रह ब्रम्हदेवाचे मंदिर आहे. तिसऱ्या गर्भग्रहाच्या ललाटबिंबावर सत्यमातृका कोरल्या आहेत. त्यावरुन तिसरे गर्भग्रह हे देवीचेच ग्रर्भगृह असावेत या मंदीराच्या शिल्पात उपना, तणी, पद्य, हस, किर्तीमुख, कोरले आहेत. अष्ठदिग्पाल, सुर सुंदरी अप्सरा, मैथुन, शिल्पे, नटराज, शिव भैरव, विष्णु, व सुर्य तसेच 38 नृत्यंगणाची शिल्पे कोरली आहेत. हे मंदिर चालुक्य राजा सोमेश्वर तिसरा याने इ.स. बाराव्या शतकात हे मंदिर बांधले असावे.[11]

## उस्मानाबाद जिल्ह्यातील तरे येथील उत्तरेश्वर मंदिर

मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथील उत्तरेश्वर मंदिर अनेक पध्दतीने लक्ष्णीय आणि महत्त्वपूर्ण आहे हे मंदिर विटानी बांधलेले असुन त्याची दरवाज्याची चौकट लाकडी आहे. सध्याही चौकट तेर येथील रामलिंग अप्पा लामतुरे वस्तुसंगृहालयात आहे. हे मंदिर अत्यंत म्हत्तवाचे आहे. कारण मंदिर स्थापत्य परंपरेचे सातत्य दाखविते की, याच गाळातील अत्यंत सुंदर असलेल्या त्रिविक्रम मंरिाचा उल्लेख सतत आलेला आहे. गजप्रष्ठाकार (APSIDIA) छपराची उभारणी करताना (Corbelling) चेतंत्र अगदी परिपूर्ण विकसीत झालेले होते. हे विधान चापाकृत तलविण्यास अलेल्या त्रिविक्रम मंदिराच्या बाबतीत तर पूर्णः खरे आहे, उत्तरेश्वर मंदिरात कॉबेलिंग (Corbelling) खुपच सोपे होते. कारण त्याचे गर्भग्रह चौरसकृती असून त्यावर कुटशिखराकृती (Pyramidas) द्राविड प्रकारचे शिखर होते. या दोन मंदिरातील आणखी एक सामन्यांचा मुद्दा म्हणजे कॉबेलिंग आणि ब्रेसिंग (Brasing) करता लांब लांकडी तुळ्यांचा केलेला वापर होय. हेमंदरी पूर्वाभिमुख असुन त्यात गर्भगृह आणि मंडपाचा समावेश होतो. त्रिविक्रम मंदिराप्रमानेच याही मंदिराचा मंडप मोठ्या आकाराचा होता असे दिसते. या मंदिराचे अधिष्ठान जरी मलव्याखाली झाकले असले तरी त्यांचे कांही थर दिसतात. या थरांवर गर्भगृहाची भिंत असून या भिंतीवर ठरावीक अंतरावर द्रावीड शैलीचे सडपातळ स्तंभ आढळतात या स्तंभाच्या मधील जागेत चैत्यगवाक्षांची नक्षी असून त्यावरील कामाच्या अपवाद वगळता कांही वंशी सकृतदरक्षणीती खरी वाटते.[12]

## सारांश :

प्राचीन मराठवाड्यातील ही कला साधना डोंगर दऱ्यातुनलेनी स्थापत्याच्या स्वरुपात जशी साकारलेली तशीच या गावातील मंदिरातुनही अविष्कृत झाली. इ.स. पूर्व पहिल्या शतकापासून देवालयाचेउल्लेख शिलालेखातुन आढळतात. भरतातील उपलब्ध अशा प्राचीन देवळामध्ये मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथील त्रिवक्रमाचे देवालय विशेष उल्लेखनिय ठरते. मराठवाड्यातील मंदीर शिल्प स्थापत्य परंपरेचा प्रारंभ तेर येथील त्रिविक्रम मंदिरापासून होतो. मंदिर स्थापत्य विकासाचे कांही निर्णायक टप्पे दर्शीविणारे मंदीर पाचव्या सहाव्या शतकात बांधलेली येथेचे आढळतात तसेच मराठवाड्यातील शिल्प व स्थापत्य परंपरेचा प्रारंभ होतो तो इ.स. पुर्व पहिल्या शतकात मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील प्रतिष्ठानाच्या (पैठण) सातवाहन सत्तेचा उल्लेख झाल्यानंतर खऱ्या अर्थाने शिल्प स्थापत कला अविष्काराला बहर आलेली दिसुन येते अजिंठाच्या डोंगरातील प्रचंड कातळातुन छन्नी हातोड्यांचे तणकार ऐक येऊ लागतात. त्यांनीच या परिसरात लेणी समुह साकरु शकले. आणि अखंड दगडातुन प्रचंड विहार त्यांनी कोरले कलाकारांची कला शक्ती ऐवढी जबरदस्त होती. की हे अमर शिल्प तयार करण्यास किती वेळ किती काळ निघुन गेला हे सांगता येत नाही, लेनीतील भिंतीवर निरनिराळ्या प्रकारचे लेख देऊन येथील चित्रकारांनी आपल्या चित्रकलेची श्रेष्ठता व अभिवृत्ती घडविली. आज हे

मराठवाड्यातील कला स्थापत्य इतिहास महाराष्ट्रालाच नव्हे संपुर्ण प्राचीन भारताच्या इतिहासाला अभिमानस्पद गौरव प्राप्त करुन देण्याचा काम या स्थापत्य शैलीने करुन दाखविले आहे. म्हणुनच आज मराठवाडा इतर विभागाच्या इतर राज्याच्या दृष्टीकोणातुन मागासलेला असला तरी कला स्थापत्याच्या बाबतीत मात्र मराठवाड्याचा इतिहास पर्यटनाच्या बाबतीत संपुर्ण इतिहासात मात्र गौरव स्थान असलेलया अभिमान मलाच नाही तर सर्व मराठवाड्यातील जनतेला अभिमान स्पद असलेला अभिमान आहे.

**संदर्भ :**


1) मराठवाड्याचा इतिहास — कौंडेकर आर.एस.
अरुणा प्रकाशन लातूर
प्रथम आवृत्ती
पृष्ठ क्र. 108

2) प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती — अनील कठारे, विजया साखरे
विद्या बुक्स पब्लिशर्स
औरंगपूरा,औरंगाबाद
दुसरी आवृत्ती पृष्ठ क्र. 481

3) कित्ता — पृष्ठ क्र. 181 – 182

4) महाराष्ट्र राज्य गॅझेटर
स्थापत्य व कला
प्रारंभिक ऐतिहासीक काळ ते यादवकाळ — अ.प्र. जामखंडेकर
प्रथम आवृत्ती
दार्शनिक विभाग,
संस्कृती क कार्य विभाग
महाराष्ट्र शासन मुंबई
पृष्ठ क्र. 43

5) प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती — अनील कठारे, विजया साखरे
वद्या बुक्स पब्लिशर्स
औरंगपूरा,औरंगाबाद
दुसरी आवृत्ती पृष्ठ क्र. 546-547

6) कित्ता — पृष्ठ क्र. 547

7) मराठवाड्याचा इतिहास — कौंडेकर आर.एस.
अरुणा प्रकाशन लातूर
प्रथम आवृत्ती पृष्ठ क्र. 126

8) प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती — अनील कठारे, विजया साखरे
वद्या बुक्स पब्लिशर्स
औरंगपूरा, औरंगाबाद दुसरी आवृत्ती पृष्ठ क्र. 552

9) कित्ता — पृष्ठ क्र. 548-549

10) प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती — अनील कठारे, विजया साखरे
वद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपूरा, औरंगाबाद
दुसरी आवृत्ती पृष्ठ क्र. 557

11) मराठवाड्याचा इतिहास — कौंडेकर आर.एस. अरुणा प्रकाशन लातूर
प्रथम आवृत्ती
पृष्ठ क्र. 131

4) महाराष्ट्र राज्य गॅझेटर — अ.प्र.जामखंडेकर
स्थापत्य व कला — प्रथम आवृत्ती

प्रारंभिक ऐतिहासीक काळ ते यादवकाळ दार्शनिक विभाग,
संस्कृती क कार्य विभाग
महाराष्ट्र शासन मुंबई
पृष्ठ क्र. 114

**संदर्भ ग्रंथ :**

1) मराठवाड्याचा इतिहास — सामनाथ रोडे
2) मराठवाड्याचा इतिहास — भांडवलकर, हनवते यु.एस.
3) मराठवाड्याचा इतिहास — अनिल कठारे
4) मराठवाड्याचा इतिहास — पी.व्ही काटे
5) भारतीय पुरातन शास्त्र — उत्तम सावंत
6) मराठवाड्याचा इतिहास — कोंडेकर आर.एस.
7) मराठवाडा काल आणि आज — भगवान काळे
8) मराठवाड्याचे कला वैभव अजंठा — अनिल कठारे
9) प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती — गायधनी राहुरकर
10) मराठवाड्याचे कला वैभव — म.श्री. माटे
11) प्राचीन भारताचा राजकीय आणि संस्कृतीक इतिहास — सोमनाथ रोडे
12) पैठन दर्शन — मोरवंचीकर रा.श्री.
13) यादव कालीन महाराष्ट्र — मुरलीधर गजानन पानसे
14) सातवाहण कालीन महाराष्ट्र — मोरवंचीकर रा.श्री.
15) मराठवाड्यातील किल्ले — उत्तम सावंत
16) भारतीय कलेचा इतिहास — विजया साखरे, अनिल कठारे